09 SEP 2026
सकाळ

# तर्कसंगत विचारांना 'एआय' पर्याय नाही : मोरे

**कोल्हापूर :** एआयमुळे माध्यम संशोधनास मदत होत आहे. अनेक गुंतागुंतीच्या डेटावर प्रक्रिया करण्यासाठी एआय संशोधकांना सहायभूत ठरत आहे. तथापि, ते मानवी मेंदूला आणि तर्कसंगत विचारांसाठी पर्याय असू शकत नाही, असे मत संगणकशास्त्र अभ्यासक राजश्री मोरे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभाग आणि संशोधन आणि विकास केंद्रातर्फे पीएम उषाअंतर्गत झालेल्या माध्यम संशोधन विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, तर संशोधक अतुल नगरकर उपस्थित होते. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी स्वागत केले. प्रीती भिसे आणि सायली गणेशकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

09 SEP 2026
तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मुलाखतीत कादंबरीकार मेधा देशमुख भास्करन यांची मुलाखत घेताना डॉ. मंजुश्री पवार व डॉ. अवनीश पाटील.

# शिवाजी महाराज हे अलौकिक क्षमतेचे योद्धे : मेधा देशमुख भास्करन

**कोल्हापूर :** आदिलशाही आणि मुघल साम्राज्याशी लढा देणारे छत्रपती शिवाजी महाराज हे युध्दाभ्यास आणि रणनीतीमध्ये अलौकिक क्षमतेचे योद्धे होते, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिध्द कादंबरीकार मेधा देशमुख भास्करन (बेंगलोर) यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रामार्फत गणित अधिविभागामधील रामानुजन संभागृहामध्ये आर्ट अँड लिटरेचर क्लब अंतर्गत प्रसिध्द इंग्रजी कादंबरीकार मेधा देशमुख भास्करन (बेंगलोर) मुलाखत संशोधक विद्यार्थ्यांशी संवादाचा कार्यक्रमात त्या बोलत होत्या. लेखिका प्रमिला जरग, मित्रा देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'चिकित्सा" या पुस्तकाच्या प्रेरणेतून 'लाईफ अँड डेथ ऑफ संभाजी" या पुस्तकासाठी प्रेरणा मिळाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शाहू संशोधन केंद्राच्या संचालिका डॉ. मंजुश्री पवार व इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी मुलाखत घेतली. सूत्रसंचालन अभय गायकवाड यांनी केले तर डॉ. देविकाराणी पाटील यांनी आभार व्यक्त केले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ डमकले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ.अरुंधती पवार, अनिता पवार आदींसह इतिहास प्रेमी, विविध अधिविभागातील संशोधक विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

0 9 SEP 2026

तरूण भारत



# विद्यापीठात शुक्रवारी गणेशमूर्ती कार्यशाळा

**कोल्हापूर :** पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभाग व सस्टेनेबिलिटी क्लबच्या माध्यमातून शुक्रवार, दि. ११ रोजी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा सकाळी ११ वाजता पर्यावरणशास्त्र विभागात होणार आहे. सण साजरा करताना पर्यावरणाचे संरक्षण व्हावे आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना समाजात रुजावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत कागदाच्या लगद्यापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कशी तयार करावी, याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण सहभागींना देण्यात येणार आहे. नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती तयार करण्याची पद्धत यावेळी शिकविण्यात येईल. या कार्यशाळेसाठी श्रद्धा योगेश साटम संसाधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेची नोंदणी फी केवळ १५० रूपये असून, नोंदणीकृत सहभागी व्यक्तींना त्यांनी तयार केलेली गणेशमूर्ती स्वत:सोबत घेऊन जाता येणार आहे. शुल्काचा भरणा घटनास्थळी करता येईल.

0 9 SEP 2026

पुढारी

# पर्यावरणपूरक गणेशमूर्तीनिर्मिती कार्यशाळा शुक्रवारी

**कोल्हापूर :** पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता पर्यावरणपूरक गणेशमूर्तीनिर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'ईशरे' व 'रास' यांच्या सहकार्याने व सस्टेनेबिलिटी क्लबच्या माध्यमातून ही कार्यशाळा पर्यावरणशास्त्र विभागात होणार आहे. कागदाच्या लगद्यापासून (पेपर पल्प) पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण सहभागींना दिले जाणार आहे. नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून मूर्ती तयार करण्याची पद्धत शिकविण्यात येईल. श्रद्धा योगेश साटम संसाधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. सहभागींना तयार केलेली गणेशमूर्ती सोबत घेऊन जाता येणार आहे. विद्यार्थी, नागरिक, गणेशभक्त व पर्यावरणप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

0 9 SEP 2026

जनप्रवास

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे विद्यापीठात आयोजन

कोल्हापूर : पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने, ISHRAE व RASSS यांच्या सहकार्याने आणि सस्टेनेबिलिटी क्लबच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पर्यावरणशास्त्र विभागात ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेचा लाभ गणेशभक्तांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

0 9 SEP 2026

सकाळ

# 'विद्यार्थी - शिक्षक नात्यातून जडणघडण'

**कोल्हापूर :** विद्यार्थी- शिक्षक यांच्या नात्यातून व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. सक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांनी सक्षम असावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे 'शिक्षक : विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा मार्गदर्शक' यावर ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्रतिभा पाटणकर होत्या. आपली आवड कशात आहे हे ओळखता येणे महत्त्वाचे आहे. समाज आणि देशाच्या विकासासाठी योगदान देण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार द्यावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

0 9 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

# विद्यापीठात मोडी लिपी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मार्फत ६ महिने कालावधीच्या 'मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमा'साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवारांना २८ सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमासाठी किमान शैक्षणिक पात्रता पदवी आवश्यक आहे.

शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषे बरोबरच मोडी लिपीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. त्यामुळे या कालखंडातील इतिहास समजून घेण्यासाठी, संशोधनासाठी आणि प्रशासकीय दस्तऐवज उलगडण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान असणे अत्यंत गरजेचे आहे.

सध्याच्या काळात सामाजिक शास्त्रांच्या विद्यार्थ्यांपुढे रोजगाराची समस्या असताना, मोडी लिपीसारखे कौशल्य रोजगाराचे नवे मार्ग खुले करू शकते. १९६० पूर्वीच्या शेतीविषयक नोंदी, जन्म-मृत्यूच्या नोंदी, खरेदीखते आणि जुने न्यायालयीन दावे यांसारखी सर्व महत्वाची कागदपत्रे मोडी लिपीतच उपलब्ध आहेत. या कागदपत्रांचे लिप्यांतर करून देण्याचे काम करून व्यावसायिकदृष्ट्या उपजीविकेचे साधन निर्माण करता येते.

इतिहास काळातील कोणत्याही विषयावर संशोधन करायचे असेल तर मोडी लिपी अवगत असणे अत्यंत गरजेचे आहे. या अभ्यासक्रमाचा संशोधक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी (०२३१) २६०९४६७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

09 SEP 2026

लोकमत

# मोडी लिपीच्या अभ्यासक्रमास प्रवेश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास विभागातर्फे सहा महिन्यांच्या 'मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमा'ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. २८ सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. किमान पदवी पात्रता आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

0 9 SEP 2026

पुढारी

# शासकीय तंत्रनिकेतनमध्ये उद्या हरित हायड्रोजन विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) 'वाणी' योजनेअंतर्गत शासकीय तंत्रनिकेतन येथे १० व ११ सप्टेंबर रोजी भारत-२०४७ (हरित) या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. ज्योतिप्रकाश यादव, प्रवीण कुमार आंबेसकर, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगलीचे डॉ. विजय मोहाळे, आयग्रीव, पुणेचे राजेश कुमठेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. आदिनाथ फुंडे, महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाचे अमोल बनसोडे यांच्यासह विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यशाळेत ऑनलाईन नोंदणी करून सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य, कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी केले आहे.